मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/आस्था/ 717 /2026-27 दि. 13 /07/2026

प्रति,

सिस्टिम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी नियुक्त करणेबाबत

संदर्भ :- मा.आयुकत महोदय यांची दि.14/06/2026 रोजीची मंजूरी

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी नियुक्त करणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी दि.14/06/2026 रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी नियुक्त करणेबाबतची जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

o/c

सोबत :- जाहीर सूचनेची प्रत

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/ ११७ /2026-27 दि. १३/07/2026

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी नियुक्त करणेबाबत

थेट मुलाखती (Walk in Interview)

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी खालील पदांच्या तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावरील जागा थेट मुलाखतीव्दारे (Walk in Interview) भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना अर्जासाठी विनंती करत आहेत. खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतींसह दि. २३/07/2026 रोजी स.10.00 वा. मा.आयुक्त यांचे कार्यालयात, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन भाईंदर (प.) येथे थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

उपलब्ध पदसंख्या :-

अ.क्र.	पदाचे नांव	पद संख्या	शैक्षणिक अर्हता व अनुभव	वयोमर्यादा
1	Depot Manager (डेपो मॅनेजर) (रू.45,000/- सर्व भत्यांसह)	01	1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/ऑटोमोबाईल अथवा तत्सम समकक्ष अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण. 2. किमान 50 बसताफा असलेल्या परिवहन उपक्रमामध्ये जड वाहनांच्या मेंटेनन्स संबंधित डेपो मॅनेजर ऑपरेशन मॅनेजर, मेंटेनन्स मॅनेजर, मेंटेनन्स अभियंता, वा तत्सम कामाचा. 3. किमान 05 वर्षाचा अनुभव असावा मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.	किमान 18 वर्षे ते कमाल 45 वर्षे
2	Accountant (लेखापाल) (रू.35,000/- सर्व भत्यांसह)	01	1. वाणिज्य शाखेतील पदवी. 2. MS-CIT 3. MS-Excel 4. Tally 5. मराठी टायपिंग 30W.P.M 6. इंग्रजी टायपिंग 40W.P.M 7. कोणत्याही परिवहन उपक्रमात लेखा विषयक काम केल्याचा किमान 05 वर्षाचा अनुभव असावा.	किमान 18 वर्षे ते कमाल 45 वर्षे

Scanned with OKEN Scanner

अटी-शर्ती :-

1) सदर कामासाठी ठोक मानधन पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त 06 महिन्यांसाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करता येईल. अथवा पुन्हा नव्याने नियुक्तीची प्रक्रिया करण्यांत येईल.
2) नियुक्तीच्या कालावधीत ठोक मानधनावर सदर काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमीपत्र / बंधपत्र घेण्यात येईल.
3) इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीमधील नमुद केलेली शैक्षणिक पात्रता / अर्हता तसेच अनुभव प्रमाणपत्र मुळ प्रती व दोन छायांकित प्रतीचे संचासह उपस्थित राहावे.

निवड प्रक्रिया :-

- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असतील.

(डॉ.संभाजी पानपट्टे)
अतिरिक्त-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner